# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः01.05.2025** **वार : गुरुवार**

---

•आगामी जनगणनेत जातनिहाय गणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

•66व्या महाराष्ट्र दिनाचा राज्यात उत्साह; प्रगत आणि संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया – मुख्यमंत्र्यांचं आवाहन

•जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात वेव्हजसाठी मुंबई सज्ज; आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन

•आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचा आज सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन

**जनगणना**

आगामी जनगणनेत जातनिहाय गणना करण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या राजकीय व्यवहारविषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. बैठकीनंतर या निर्णयाबद्दल माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी माध्यमांना माहिती दिली. काही राज्यांनी जातनिहाय गणना केली असून काही राज्यांनी याबाबतीत सर्वेक्षण केलं आहे. मात्र बहुतांश ठिकाणी असं सर्वेक्षण हे राजकीय दृष्टिकोनातून आणि अपारदर्शक पद्धतीनं करण्यात आलं असल्याचं वैष्णव म्हणाले. अशा सर्वेक्षणांमुळे समाजात संभ्रम निर्माण झाला आहे. या सर्वांचा विचार करून आणि देशाच्या सामाजिक रचनेला राजकारणामुळे अडथळा येऊ नये यासाठी, जनगणनेत जातींची गणना पारदर्शकपणे समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याचं वैष्णव यांनी सांगितलं.

2025-26 च्या साखर हंगामात शेतकऱ्यांना उसासाठी तीन हजार 550 रुपये प्रति टन FRP म्हणजेच रास्त भाव देण्यासही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयाचा फायदा पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तसंच साखर कारखान्यांमध्ये आणि संबंधित सहाय्यक कामांमध्ये काम करणाऱ्या पाच लाख कामगारांना होईल, असं वैष्णव म्हणाले.

**<u>महाराष्ट्रदिन</u>**

महाराष्ट्र राज्याच्या 66वा वर्धापन दिन आज राज्यात उत्साहात साजरा होत आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज दादरच्या शिवाजी पार्क इथं होणार आहे.

देशाच्या विकासात महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावत असून, आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून, सहकार्यातून आणखी प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया, असं आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातल्या सर्व जिल्हा मुख्यालयांत आज ध्वजारोहण करण्यात येणार असून ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात ‘मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचं उद्घाटन आज करण्यात येणार आहे.

आजच आंतरराष्ट्रीय कामगार दिनही साजरा केला जात आहे. कामगारांच्या हक्काबाबत जागृती व्हावी या उद्देशांन आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>इंट्रो</u>**

**वेव्हज**

जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात वेव्हज चं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईत होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेचा उद्देश, माध्यमं, मनोरंजन आणि डिजिटल नवोन्मेष क्षेत्रातली भारताची प्रतिभा अधोरेखित करणं तसंच तरुणांसाठी नवनिर्मितीच्या अभिनव संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांना व्यासपीठ देणं, असा आहे.

वेव्हज विषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून...

*वेव्हज २०२५ साठी स्वप्ननगरी मुंबई सज्ज झाली आहे. १५ हजार वर्ग मीटर परिसरात पसरलेल्या या भव्य परिषदेत माध्यमं, मनोरंजन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या आघाडीच्या व्यक्ती, कंपन्या आणि या क्षेत्रात येऊ पाहणारी नवी प्रतिभा एकत्र येणार आहे. पहिलावहिला जागतिक माध्यम संवादही या परिषदेत होईल, याशिवाय, सर्जक आर्थिक क्षेत्राला चालना देण्यासाठी सर्वसमावेशक वेव्हज बाजार आयोजित केला आहे. गेल्या जवळपास वर्षभराच्या कालावधीत देशभरात झालेल्या ३२ क्रिएट इन इंडिया चॅलेंजमधून निवडलेल्या स्पर्धकांचा क्रिएटोस्फिअर हेही वेव्हज परिषदेचं आकर्षण आहे. 'कला टू कोड' या विषयावर आधारित भारत पॅव्हिलियन वेव्हजमध्ये उभारलं आहे. यात, कला, कृती, दृष्टी आणि क्रिएटर्स लीप या चार विभागांद्वारे भारताची समृद्ध कथाकथन परंपरा नागरिकांना अनुभवता येईल. याशिवाय विविध प्रदर्शनं, दालनं, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही वेव्हज २०२५ मध्ये असणार आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून अंकिता आपटे.*

**आकाशवाणी-वर्धापनदिन**

आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन आज साजरा होत आहे. गेल्या 50 वर्षांपासून श्रोत्यांच्या पसंतीला उतरलेल्या या वृत्त विभागाच्या वाटचालीचा आढावा आमच्या प्रतिनिधीकडून...

***<u>स्क्रिप्ट</u>***

*आकाशवाणी पुणे केंद्राचा प्रादेशिक वृत्त विभाग आज आपली सुवर्ण महोत्सवी वाटचाल पूर्ण करीत आहे. एक मे 1975 रोजी सुरू झालेल्या प्रादेशिक वृत्त विभागात त्यावेळी इथली घडी बसवण्यासाठी नवी दिल्लीहून सदाशिव दीक्षित आणि सुधा नरवणे या दोघांना पाठविण्यात आलं होतं. सदाशिव दीक्षित यांनीच या केंद्रातलं पहिलं प्रादेशिक बातमीपत्र वाचलं. रात्रीतून घडलेल्या ताज्या घटनांचं नेमकं वृत्तांकन, साधी सोपी भाषा, छोटी सुटसुटीत वाक्यं, क्रियापदं वगळून नेमक्या ठळक बातम्या आणि उत्तम सादरीकरण यामुळे या विभागाच्या बातमीपत्रांना अल्पावधीतच लोकप्रियता मिळाली. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत इथल्या बातमीपत्रांमध्येही अनेक चांगले बदल केले गेले. कधी बातमीच्या केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीच्या आवाजात बातमीचे विश्लेषण किंवा प्रतिक्रिया, कधी एखाद्या वेगळ्या विशिष्ट विषयावर अधिक माहिती देणारा बातमीदाराच्या आवाजातील व्हॉइस कास्ट, कधी मान्यवर नेत्यांच्या भाषणातील काही ध्वनिमुद्रित अंश यांचा अंतर्भाव बातमीपत्रात व्हायला लागला. कोविड आपत्तीच्या काळात या वृत्त विभागातून तीन राष्ट्रीय बातमीपत्र आणि कोविड विषयीचं विशेष बातमीपत्रही प्रसारित होत होतं. जिल्हा वार्तापत्र, त्या त्या आठवड्यातील महत्त्वाचा विषय मांडणारी एखादी मुलाखत असलेला 'विशेष वार्ता' आणि आठवड्याभरातील वेगळ्या कार्यक्रमांचं वृत्तांकन करणारं 'वार्ताचित्र' असे साप्ताहिक कार्यक्रम अर्थात न्यूजरील्सही श्रोत्यांच्या पसंतीला उतरले. आता विविध समाज माध्यमांवरचं प्रादेशिक वृत्त विभागाचं अस्तित्वही लक्षवेधी ठरलं आहे. दृक्श्राव्य वाहिन्यांच्या सुळसुळाटात आपल्या विश्वासार्ह आणि निःपक्षपाती कामगिरीमुळे दररोज सेकंदांवर सुरू असलेली प्रादेशिक वृत्त विभागाची ही सुवर्ण महोत्सवी वाटचाल खरोखरीच सुवर्णी ठरली आहे, असं म्हणावं लागेल... आकाशवाणी बातम्यांसाठी पुण्याहून डॉक्टर स्वाती महाळंक.*

**<u>अक्षयतृतीया</u>**

साडे तीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षयतृतीयेचा सण काल देशात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यादिवशी सुरु करण्यात आलेली गोष्ट अक्षय टिकते अशी धारणा आहे, त्यामुळं या दिवशी सोने, वास्तू, वाहन खरेदीसाठी गर्दी झाली होती. राज्यात अक्षय तृतीयेला अनेक ग्रामीण- दुर्गम भागात बालविवाह लावले जातात. हे विवाह रोखण्यासाठी विविध जिल्ह्यात मोहीम राबवली गेली. राज्यात एकंदर २६ बालविवाह रोखण्यात प्रशासनाला यश आलं आहे.

**<u>बसवेश्वर-तुकडोजीमहाराज</u>**

सामाजिक क्रांतीचे उद्गाते महात्मा बसवेश्वर आणि एकात्मतेचा संदेश देणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंतीही काल सर्वत्र उत्साहात साजरी करम्यात आली. महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त सांगलीमध्ये पारायण, बसव व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर, पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. नांदेडमध्येही एका शोभायात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>पुरातन-वास्तू</u>**

परभणी जिल्ह्यातल्या पुरातन वास्तूंचं संवर्धन आणि विकास कामांचा आढावा राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांनी घेतला. जिल्ह्यातल्या पुरातन स्थळांचं संवर्धन करून पर्यटनाच्या दृष्टीनं त्यांचा विकास करण्याच्या सूचना राज्यमंत्र्यांनी दिल्या.

**<u>ई-ऑफिस</u>**

कृषी विभागाशी संबंधित सर्व कार्यालयांमध्ये ई-ऑफिस प्रणाली कार्यान्वित करणारा अहिल्यानगर हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे यांनी  ही माहिती दिली.

**<u>कृत्रिमबुद्धीमत्ता</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून सरकारी कामकाजाविषयी नागरिकांकडून माहिती घेऊन त्यानुसार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा उपक्रम सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी राबवला आहे. देशात या तंत्रज्ञानाचा वापर करणारा सोलापूर हा पहिलाच जिल्हा आहे.

प्रायोगिक तत्वावर शिक्षण, महिला आणि बालकल्याण, जिल्हा पुरवठा विभाग, पशुसंवर्धन आणि आरोग्य विभागाचा समावेश करण्यात आला आहे. AI कक्षातून दररोज 15 ते 20 हजार नागरिकांशी संपर्क साधून त्यांना 30 सेकंदात तीन प्रश्न विचारले जातात. त्यातून मिळालेल्या उत्तरांचं विश्लेषण करून पुढील कार्यवाही केली जाते.

**गवई**

देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 14 मेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

आजारावरील उपचारांसाठी ते चेन्नईतील रुग्णालयात होते. आंबटकर यांनी वर्धा जिल्ह्यातल्या वडनेरचं विधीमंडळात प्रतिनिधित्व केलं होतं.

**क्रिकेट-प्रशांत**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल चेन्नई सुपर किंग्ज संघाचा पंजाब किंग्ज इलेव्हन संघाने 4 गडी राखून पराभव केला. या पराभवामुळं चेन्नईचा संघ स्पर्धेतून बाहेर पडणारा पहिला संघ ठरला आहे. चेन्नईच्या 190 धावांना प्रत्युत्तर देताना पंजाबनं 194 धावा केल्या. पंजाबकडून यजुवेंद्र चहलनं एकाच षटकात 4 गडी बाद केले.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**